## <u>विशेष दिवाणी दावा क्र. ०८/२०१७ मधील नि.क्र. १६० वरील आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज वादींतर्फे साक्षीदारास साक्षी समन्स काढण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. वादींच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुतचे प्रकरण आज रोजी पुराव्याकामी नेमलेले आहे. वादी असे कथन करतात की, सदर दाव्यामध्ये वादीतर्फे साक्षीदार म्हणून विधीज्ञ श्री. विलास एम. गायकवाड, नोटरी, भारत सरकार, रा. म्हसवड, तालुका - माण, जिल्हा - सातारा यांची साक्ष नोंदवणे न्यायाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. सदर दाव्यातील महत्वाचे दस्त त्यांचे समोर नोंदवण्यात आले आहेत. सदर नोटरी विधीज्ञ यांची साक्ष प्रस्तुत दाव्याचे न्यायनिवाडा करणेकरीता आवश्यक आहे. त्यामुळे सदर नोटरी विधीज्ञ यांना साक्षी करिता समंस काढणेत यावे, अशी वादींनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र. १अ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत नोंदविली आहे. प्रतिवादी क्र. १अ यांचे असे म्हणणे आहे की, वादीच्या अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. नोटरी रजिष्टर नं. ४४७/२०१६ व ४०९/२०१६ ला पूर्वीच निशाणी क्र. १५९ व नि. क्र.१२६ अन्वये देणेत आली आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा असे प्रतिवादी क्र. १अ याने विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी क्र. २ यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज हा संदिग्ध कथनाचा असून तो कायदेशीर नाही. साक्षीदार कोणत्या दस्तावर, कोणत्या कारणासाठी तपासणेचा आहे, त्याचा उल्लेख केलेला नाही. तथाकथित साठेखतास निशाणी पडलेल्या आहेत. त्यावरील साक्षीदार तपासलेले आहेत. त्यामुळे ते पुराव्याच्या कामी वाचता येतील. त्यासाठी नोटरी विधीज्ञ यांची साक्ष नोंदविणेची गरज नाही. वादी यांनी अर्जामध्ये नोटरी विधीज्ञ यांना तपासणेचे कारण नमूद केलेले नाही. अशा स्वरुपाचा संदिग्ध अर्ज मंजूर करता येणार नाही. करीता प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी प्रतिवादी क्र. २ याने विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र. १अ व २ यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांचे विधीज्ञ गैरहजर.

०५. प्रस्तुत दाव्याच्या अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता असे सरळ-सरळ दिसून येते की, प्रस्तुत दावा हा खरेदीखत करुन मिळण्यासाठी, जाहिर ठराव व निरंतर ताकीदी करीता दाखल केला आहे. माझ्या मते, वादी व प्रतिवादी यांचेमधील प्रलंबित असलेल्या वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी वादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही पक्षांमधील वाद समुळ निकाली काढण्यासाठी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींना वादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे व उलटतपास दरम्यान प्रतिवादींना वादीच्या साक्षीदाराची सत्यता तपासण्याची संधी प्राप्त होणार आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी अर्जात नमूद केलेल्या साक्षीदारास साक्षी समन्स काढण्यात यावे. वादींनी साक्षीदारास नियमानुसार साक्षी भत्ता दयावा.

दि.०९.०१.२०२६.

(सलीम पी. सैय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.